# नोकरशाही (ब्युरोक्रसी )

Lalita Gandbhir

4200 N.OCEAN DRIVE,

1501-2

RIVIERA BEACH,

FL 33404 USA

## नोकरशाही अमर असते !

आटपाट नगर होतं. तिथे एक राजा होता. त्याचा पुत्र तारुण्यात आला होता. एकदा राजपुत्राचा एक मित्र राजपुत्राकडे तक्रार घेऊन आला." मी हत्ती पाळण्याचा परवाना घ्यायला म्युनिसिपालटीत गेलो,तर तिथल्या कर्मचाऱ्यानी (ब्युरोक्रॅटसनी) मला लई वैताग दिला रे मित्रा."

"काय केलं त्यांनी?" राजपुत्राने विचारलं.

"तूच गुप्त वेषात माझ्याबरोबर चल आणि अनुभव घेऊन बघ." मित्राने विनंती केली.

राजपुत्र आणि त्याचा मित्र गुप्त वेषात भल्या पहाटे म्युनिसिपालटीत पोहोचले. मुख्य दाराला भलं, मोठं कुलूप. रस्त्यावरची झाडूवाली म्हणाली ,"येवढ्या लवकर हिथं कोन येणार?"

मग ते परत अकरा वाजता गेले. पट्टेवाला म्हणाला,"हत्तीच लायसन? दिवस चुकला. बुधवारी या."

राजपुत्र व त्याचा मित्र बुधवारी बरोब्बर अकरा वाजता म्युनिसिपालटीत गेले तर रस्त्यावर मोठ्ठी लाईन होती. पट्टेवाला म्हणाला,"नंबर घ्या." गाढव,.घोडं,खेचर,तट्टू,हत्ती,रथ ह्या सर्व लायसनवाल्यांच्या मागे राजपुत्र व त्याच्या मित्राने नंबर लावला.

लंच ब्रेक झाला. लायसनची खिडकी म्युनिसिपालटीवाल्यांनी बंद केली. ते लंचला निघून गेले. आपला नंबर जाईल या भीतीने,भूक लागली तरी सुद्धा राजपुत्र व त्याचा मित्र ताटकळत लाईनीत बसून राहिले. दोन वाजता खिडकी उघडली. तीन वाजता राजपुत्र व त्याचा मित्र खिडकीजवळ पोचले. खिडकीवाला म्हणाला,"कॉफी ब्रेक"! खिडकी बंद करून तो निघून गेला. चार वाजता खडकी उघडली.खिडकीवाल्याने एक फॉर्म दिला. तो म्हणाला, "हा फॉर्म भरा ".

अर्ध्या तासाने त्याने राजपुत्राला कॉल दिला. भरलेला फॉर्म तो वाचू लागला.

"हत्तीच नाव,गोडू. आईच नाव गोडी."

“बापाचं नावं का लिहिलं नाही?” त्याने राजपुत्राला विचारलं.

“कारण आम्हाला बापाचं नावं माहिती नाही” राजपुत्राने सांगितलं.

“माहिती नाही तर विचारा” खिडकीवाल्याने थंडपणे म्हटलं.

“अहो, हत्ती कळपातून पकडून आणलाय,नाव कुणाला विचारणार? हत्तीणीला?”

“ते माहिती नाही बाबा आपल्याला. फॉर्म पूर्ण भरलेला मात्र हवा”.

“द्या फॉर्म! भरतो मी बापाचं नाव.”

राजपुत्राने बापाचं नाव लिहिलं,“गोंडावळा.”

“तुम्ही बापाची उंची, आईची उंची, त्यांच्या सोंडेची लांबी आणि पोटाचा घेर फॉर्ममध्ये भरलेला दिसत नाही.”

“अहो, आई जंगलात, बाप काल्पनिक,मापं कशी भरायची सांगा?” राजपुत्राने वैतागून विचारलं.

“तो तुमचा प्रॉब्लेम आहे” खिडकीवाला म्हणाला.

राजपुत्राने खोटीच मापं लिहिली.

“गोडूच्या शेपटीचा केस कुठाय?”

“तो कशाला?” राजपुत्राने विचारलं.

“गोडूचा खून झाला तर त्याची बॉडी आयडेंटीफाय करायला. शिवाय त्याचे फूटप्रिंटस् व ब्लडची ट्यूबही पाहिजे साहेब.”

“हे सर्व कशाला हवं?”

“गोडूने एखादा गुन्हा केला तर त्याला ओळखायला फूटप्रिंटस् आणि एड्सची टेस्ट करायला ब्लड.”खिडकीवाल्याने खुलासा केला.

“हत्तीला एड्स होतो का?” राजपुत्राने रागावून विचारलं.

त्याच्याशी आपल्याला काय करायचंय ?”फॉर्म पूर्ण हवा साहेब. पुढच्या बुधवारी शेपटीचा केस आणि रक्ताची ट्यूब घेऊन या. आणि हे पहा, तुम्ही फारवेळ खाल्ला. आता इथनं हला बघू.”

राजपुत्र भयंकर भडकला. त्याने फॉर्म फाडून टाकला.”महामूर्ख, बेअक्कल, बदमाष लेकाचे. तुला,तुझ्या बॉसला, तुझ्या सुपरबॉसला, इथल्या सगळ्या नोकरशाहीलाच मी गोडीच्या आणि गोडूच्या पायी देणार” तो अत्यंत रागारागाने म्हणाला.

"तुम्ही स्वतःला कोण समजता राव?"खिडकीवाल्याने राजपुत्राला विचारलं.

"मी इथला राजपुत्र" राजपुत्र म्हणाला.

"अरे जा,तुझ्यासारखे छपन्न राजपुत्र ह्या म्युनिसिपालटीने पाहिलेत"! खिडकीवाला राजपुत्राकडे तुच्छतेने बघत कुत्सितपणे हसला.

राजपुत्र तावातावाने घरी गेला.तो राजाला म्हणाला. "महाराज,आपल्या राज्यातल्या सर्व नोकरशहांचा शिरच्छेद करण्याचा हुकुम द्यावा."

"का?काय झालं?" राजाने विचारलं.

"आज मी गुप्त वेषात हत्ती पाळण्याचं लायसन आणायला गेलो होतो."

राजा खिन्नपणे हसला आणि म्हणाला, "पुढे सांगायची जरुरी नाही. पुढची कथा मला ठाऊक आहे. मीही एकदा तरुण होतो. आयडिॲलिस्टिक इडियट होतो. आता तुझी पाळी आलीय. आता हा मुकुट मी अती आनंदाने तुझ्या माथ्यावर ठेवतो. नोकरशाहीच्या कुत्रीला तूच आवर." राजाने राजपुत्राच्या डोक्यावर राजमुकुट ठेवला.

राजपुत्राने दुसऱ्याच दिवशी सेनापतीला बोलावलं व हुकुम दिला. "सगळ्या नोकरशहांचा शिरच्छेद करा. त्यांच्या ऑफिसांना कुलूप ठोका."

सेनापती म्हणाला,"जशी आज्ञा महाराज."

सेनापतीने करखाते, जकातखाते, शिक्षणखाते, वाहतूकखाते, पोस्टखाते,पाणीखाते, व सगळे लायसेन्सवाले यांचा एका दिवसात शिरच्छेद केला. आणि त्या सर्वांना त्याने एका खड्यात गाडलं.

राजपुत्र आता एकटाच राहिला. कर वसुली होईना, रस्ते झाडले जाईनात, वाहतूक चालेना ,न्याय अन्याय होईना, मुलं शाळेत जाईनात, पाणीपुरवठा होईना.

राजपुत्राचा मित्र एक दिवस वैतागून राजपुत्राकडे आला.म्हणाला,"राज्यात गोंधळ आहे माजलेला,पंतप्रधान तू नेम मला.तू आणि मी गोंधळ आवरू सारा." खड्यातल्या कलेवरांच्या छातीत ह्या शब्दांबरोबर धुकधुगी निर्माण झाली.

थोड्या दिवसांनी राजपुत्राचा मित्र तारवटलेल्या डोळयांनी खुरडत खुरडत राजपुत्राकडे परत आला व म्हणाला,"कामाच्या ओझ्याने मी आहे वाकलेला. उपपंतप्रधान व चार खातेप्रमुख हवेत मला."

"त्या रात्री कलेवरांच्यामधले पाच जीव हळूच उठून बसले. दुसऱ्या दिवशी सकाळी नोकरशाहीच्या इमारतीत जाऊन ते स्थानापन्न झाले.ते पाचजण आपली किमया पसरू लागले.

प्रधानाचा चीफ सेक्रेटरी, डेप्युटी सेक्रेटरीची ॲडमिनिस्ट्रेटिव्ह असिस्टंट, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह असिस्टंटचा पट्टेवाला,पट्टेवाल्याचा कुत्रा, असं करत करत सगळी नोकरशाही हळूहळू सजीव झाली व आपापल्या जागी बसून सत्ता गाजवू लागली.

पंचवीस वर्ष उलटली. राजपुत्राच्या पुत्राचा मित्र त्याच्याकडे हत्ती पाळण्याबद्दलच्या लायसेन्सची तक्रार घेऊन आला व इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

राजपुत्राचा पुत्र नोकरशाहीबद्दलची तक्रार घेऊन राजपुत्राकडे गेला. पन्नाशीपुढे पोचलेला राजपुत्र मुलाची तक्रार ऐकून खिन्नपणे हसला. तो आपल्या मुलाला म्हणाला,"युवराज,तुझ्या आजोबांच्या कारकिर्दीतल्या सिव्हील सर्व्हंटसची यादी शोध बरे."

ती यादी घेऊन ते दोघेही नोकरशाहीच्या आश्रमात गेले.तिथे नोकरशाहीचे गर्भपंडित व गर्भमहापंडित नसलेल्या कामात गढलेले होते आणि वेटिंग रुममध्ये लोक तिष्ठत बसले होते.

राजपुत्र यादी वाचू लागला,--

पिंटोच्या जागी पिंटो होता.

कुलकर्णीच्या जागी कुलकर्णी होता.

फिश्चेव्हाच्या जागी फिश्चेव्ह होता.

याबलास्कीच्या जागी याबलास्की होता.

डिंग डाँगच्या जागी डिंग डाँग होता.

महालिंगमच्या जागी महालिंगम होता.

राजपुत्र पुत्रासह धावत गावाबाहेर गेला. तिथला नोकरशाही गाडलेला खड्डा उकरू लागला. महिनाभर खड्डा उकरल्यावरही ,त्याच्या हातात हाडाच लहानसा तुकडाही नाही लागला.

राजाने आपला मुकुट मुलाच्या डोक्यावर ठेवला व स्वतःला खड्ड्यात गाडून घेत तो म्हणाला,
**"नोकरशाही अमर असते, युवराज,नोकरशाही अमर असते !!"**

***

# नोकरशाही सत्ताधारी असते.

आटपाट नगर होतं. त्याचा एक राजा होता. त्याला मदन नावाचा पुत्र होता. एकदा मदन बापाकडे गेला व विचारू लागला. "बाबा,राज्यशाहीत राजाची,लोकशाहीत लोकांची, कम्युनिझममध्ये त्या पार्टीची, हुकुमशाहीत हुकुमशहाची,धार्मिक राज्यात घर्मगुरूंची सत्ता असते, हे बरोबर आहे का?"

राजा म्हणाला,"युवराज हे सर्व थिअरॅटिकली बरोबर पण प्रॅक्टिकली चूक".

मदनाने विचारलं, "मग बाबा, प्रॅक्टिकली कुणाची सत्ता असते?"

राजा म्हणाला, "युवराज,स्वानुभवासारखा शिक्षक नाही.तू लिलंडला जा आणि तिथून आंबे विकण्याचं लायसन मिळवून आण".

मदन लिलंडला गेला. तो राजपुत्र असल्याने त्याला थेट पंतप्रधानाची अपॉइंटमेंट मिळाली. मदनाने पंतप्रधानाला आपलं काम सांगितलं."मला आंबे विकण्याचं लायसन हवय".

पंतप्रधान गंभीरपणे म्हणाला,"फारच कठीण काम आहे. तुला फॉरेन एड हवी असती, अन्नधान्य हवं असतं, शरणागत हवी असती, अगदी न्युक्लीअर बॉम्ब हवा असता तरी मी तो सहज दिला असता. पण हे काम माझ्या कक्षेतल नाही. तू आवकजावक खात्यात जा."

राजपुत्र आवकजावक खात्यात गेला. ते म्हणाले,"प्रथम वनस्पतीखात्याचं परमिट आण."

वनस्पतीखातेवाले म्हणाले,"तू प्रथम किडामुंगीखात्याचं परमिट आण."

किडामुंगीखातेवाले म्हणाले,"भुईखात्याचं परमिट आण."

भुईखातेवाले म्हणाले,"ऊनपाऊसखात्याचं परमिट आण."

ऊनपाऊसखातेवाले म्हणाले,"फळखात्याचं परमिट आण."

फळखातेवाले म्हणाले,"आवकजावक खातेवाल्यांच परमिट आण."

राजपुत्र परत आवकजावकखात्याकडे गेला व म्हणाला"रावसाहेब,तुमच्या परमिटशिवाय फळखात परमिट देत नाही.फळखात्याच्या परमिटशिवाय ऊनपाऊसवाले परमिट देत नाहीत. इ.इ."

आवकजावकवाले म्हणाले, "ते काय आमाला माहीत नाय. तो तुझा प्रॉब्लेम हाय."

मदन मग परत पंतप्रधानांकडे गेला.पंतप्रधान म्हणाला,"ह्या बाबतीत ह्या देशात सर्व अधिकार त्या प्रचंड नोकरशाहीच्या हातात आहेत. त्यांच्यापुढे मी हतबल आहे रे बाळा."

मदन नाईलाजाने घरी परतला.

मदनला बघताच राजा हसला व म्हणाला, "आता तू धर्मशाहीत जा आणि तिथल्या महामंदिरातली एकच पणती आण."

राजपुत्राला सर्वोच्च धर्मगुरूंची अपॉइंटमेंट मिळाली. मदनने पणती मागितली. धर्मगुरू म्हणाले, "फारच कठीण आहे. जर तुला धर्मप्रचारासाठी धर्मगुरू हवे असते,धर्मग्रंथ हवे असते,तुझ्या राज्यात आमचं देऊळ बांधायचं असत किंवा इतर धर्मीयांचं देऊळ पडण्यासाठी बॉम्ब अथवा मॉब हवा असता तर काम माझ्या हातचं होतं. पण पणतीसाठी मात्र तुला उपमुख्यधर्मगुरूंकडे जायला हवं.

अनेक उप उप उपंना मदन भेटला. अगदी टोटम पोलच्या बॉटमवाल्या 'उप'ने मदनला ऐतिहासिकखात्याकडे पाठवला. ऐतिहासिक खात्याने उत्खननखात्याकडे पाठवला. उत्खननवाले म्हणाले,"उत्खनन चाललंय तिथे मंदिरातल्या पणतीसारखी पणती मिळाली तर एखादी पणती आम्ही तुला विकू. अर्ज भरून ठेव बरं बाळा."

मदन म्हणाला,"अहो,पण तुमच्या महामंदिरात लाखो पणत्या धूळ खात पडल्यात. त्यातली एक द्या की मला.!"

"तो मुद्दा नाही",उत्खनन वाला म्हणाला.आमच्या ताब्यातली कुठलीही वस्तू, मग ती किंमती असो वा स्वस्त, आम्ही हातची सोडत नाही.आमची तशी पॉलिसीच आहे."

मदन परत धर्मगुरुंकडे गेला. ते म्हणाले,"नाही ना पणती मिळाली बाळा? दुर्दैवाने पणती अधिकार सर्वस्वी माझ्या स्वाधीन नाहीत. मी काही करू शकत नाही रे बाळा."

मदन रिक्त हस्ते परतला. तो राजाला म्हणाला,"बाबा,मला आता हुकुमशाहीत, बादशाहीत, बेबंदशाहीत, अंधशाहीत, अथवा कुठल्याही शाहीत जाण्याची जरुरी नाही. तुम्ही शिकवत असलेला धडा मी उत्तम रित्या शिकलोय. जगातल्या सर्वच शाही असतात नामधारी. **नोकरशाही असते ती खरी खरी सत्ताधारी."**

***

## नोकरशाही शिस्तीची असते.

आपल्या वडिलांच्या पश्चात मदनराज राजा झाला. एक दिवस तो त्याच्या राज्यातल्या नोकरशाहीवर भयंकर भडकला. सगळी नोकरशाही नष्ट करता आली नाही तरी सर्व नोकरशहांच्या प्रमुखांची ऑफिस असलेली इमारत नष्ट करायची असा मदनने निर्णय घेतला. त्याने त्या कामासाठी रशिया व अमेरिकेतून बॉम्ब मागवले. आपल्याला मिळालेल्या हुकुमानुसार रशिया व अमेरिकेच्या नोकरशाहीने मदनच्या राज्यातल्या नोकरशाहीला न्युक्लियर बॉम्ब पाठवले. ते मदनच्या राज्यातल्या नोकरशाहीने आपल्या फाईल रूममधल्या फाईलीत व्यवस्थित फाईल केले.

गेली पंचवीस वर्षे मदनराज नोकरशाहीच्या फाईलीमध्ये न्युक्लियर बॉम्ब शोधण्याचा प्रयत्न करतोय. अजूनही ते त्याला सापडले नाहीत. त्याने तक्रार केली की त्याला नेहमीचंच स्टँडर्ड उत्तर मिळत, "आमच्या फाईलीत कधीही काहीही हरवत नाही महाराज.आमचं सगळं काम अगदी शिस्तीचं असतं ! "

***

## नोकरशाही ~ एक आवश्यक कटकट

आटपाट नगर होत. त्याचा एक राजा होता. एक दिवस पाणीखात्याचा प्रमुख राजाला भेटायला आला. तो म्हणाला,"आपल्या राज्यात गेल्या वर्षात पाऊस कमी पडला. त्यामुळे पाण्याचा तुटवडा झाला आहे. आपण पाण्यावरचा कर थोडासा वाढवूया का? पाणीकर वाढवला तर लोक पाणी जपून वापरतील.पाण्याची बचत होऊन तुटवडा कमी होईल."

राजा म्हणाला,"पाणी फुकट गेलं,पाण्याशिवाय दुष्काळ पडला तरी हरकत नाही. पाणीकर वाढवणार नाही."

राजपुत्र हे संभाषण ऐकत होता. तो म्हणाला,"हा पाणीकराबद्दलचा पाणीखातेप्रमुखाचा योग्य सल्ला तुम्ही का म्हणून नाकारला? राज्यात पाण्याचा तुटवडा झाला,तर प्रॉब्लेम नाही का होणार जनतेला?"

राजा म्हणाला,"युवराज,तुला धडा शिकवायला मी स्वतःच नाक कापून स्वीकारणार आहे हा सल्ला. फक्त यापुढे हा पाणीप्रमुख ब्युरोक्रॅट परत आला तर तू तोंड द्यायचंस, करवाढीने उभ्या राहिलेल्या कठीण परिस्थितीला."

सहा महिन्यांनी पाणीप्रमुख परत आला.तो म्हणाला,"महाराज घोटाळा झाला.पाणीकर वाढवला म्हणून लोक लागलेत पाण्याची बचत करायला.त्यांनी पाणी कमी वापरल्यामुळे आम्ही गोळा केलेला पाणीकराचा पैसा पुरात नाही आमच्या खात्याला.म्हणून पाणीकर पुन्हा वाढवायला पाहिजे."

राजपुत्र तेथे होता.तो पाणीकरखाते प्रमुखाला म्हणाला,"पाणीकरारचा पैसा कमी पडतोय, तर काढून टाका तुमच्या खात्याच्या कर्मचाऱ्यांना ."

पाणीखाते प्रमुख म्हणाला. "ते शक्य नाही.अहो,युवराज,त्यांची युनियन आहे.शिवाय वाढलेला कर गोळा करायला असलेली नोकरमाणसंच कमी पडतात खात्याला."

राजाने विचारलं,"युवराज,आता काय करावं? विचार करून उत्तर द्या. तुमच्या शिक्षणासाठी हा खटाटोप आहे सगळा."

राजपुत्र गोंधळला. त्याला काही मार्ग दिसेना शेवटी तो म्हणाला,"वाढवा झालं कर. दुसरं काय करणं आपल्याला शक्य आहे?"

सहा महिन्यांनी पाणीप्रमुख परत आला.तो म्हणाला,"महाराज,घोटाळा झाला.लोकानी पाण्याची आणखी बचत केली.म्हणून दुर्दैवाने पाणीखात्याच्या खर्चाला पाणीकराचा गोळा झालेला पैसा आता पुरत नाही.शिवाय

कर फार वाढला म्हणून लोकांनी पाणीकरविरोधी मोहिमा गावोंगावीं सुरु केल्या आहेत. परिणामी पाणीखात्याच्या माणसांना, पाणीकराचा पैसा घरोघरी जाऊन गोळा करावा लागतोय.परिणामी पाणीखात्याला आता पैसा गोळा करणाऱ्या नोकरांची संख्या पाहिजे की हो वाढवायला. शिवाय माझ्या लक्षात आलं आहे की पैसा गोळा करणारा नोकरवर्ग मधेच थोडा पैसा खात आहेत.परिणामी आता पाणीखात्याला पाणीकराचा गोळा झालेला पैसा पुरत नाही तर आता पाणीकर परत वाढवायला पाहिजे."

पाणीखातेप्रमुखाकडे आ वासून बघत बसलेल्या राजपुत्राला राजा म्हणाला, "हे युवराज, तुला मी शिकवत असलेला धडा, महाग पडतोय आपल्या जनतेला."

राजपुत्र आता पुरा गोंधळला होता.तो म्हणाला,"हे गणित आता कसं सोडवायचं?तुम्हीच सांगा बाबा."

राजा म्हणाला, "युवराज,लक्षात ठेव.जनतेवर बसवलेला कर अथवा नोकरशाहीत चिकटलेला नोकर हे कधीच अस्ताला जात नाहीत. हिंसक अथवा अहिंसक क्रांती, तात्विक राजकीय फेरबदल अशा अनेक मार्गांनी जनतेने असलेली व्यवस्था बदलून नोकरशाही अगदी मुळातून नष्ट करण्याचा परतपरत व्यर्थ प्रयत्न केला आहे. पण नोकरशाहीची मुळं जमिनीत तग धरून जिवंत राहतात कारण नोकरशाही अमर असते. नव्या राजवटीत तिची मूळं परत उगवतात. नोकरशाहीच नवं झाड मग वडाच्या झाडासारखं नवीननवीन मुळं जमिनीत टाकतं. ह्या मुळातून नवी नोकरशाही व तिचे नोकर जमीनरुपी जनतेचं शोषण करण्यासाठी निर्माण होत राहतात. नोकरशाही धरली तर चावते. सोडली तर पळते पण तिला नष्ट करण्याचा प्रयत्न केला तर राज्याचा रथ चालत नाही. नोकरशाहीला सतत लगाम घालायला हवा.'ब्युरॉक्रसी इज अ नेसेसरी इव्हील.'जो राजा नोकरशाही यशस्वीपणे सांभाळतो,तोच टिकतो. इतर सगळे राजे राज्याला मुकतात.

"पण बाबा,पाणीकराचं काय करायचं?"राजपुत्राने नोकरशाही विषयीचा धडा आत्मसात करण्याचा प्रयत्न करत विचारलं.

दुर्दैवाने शहाण्या व अनुभवी राजाला ह्या प्रश्नाचं उत्तर देताच आलं नाही.राजवाड्याबाहेरून घोषणा व आरडाओरडा ऐकू येऊ लागला. मोठा जमाव पहारेकऱ्यांचे खून करून राजवाड्यात सर्व दरवाज्यातून घुसला."पाणीकर मुर्दाबाद,राजा मुर्दाबाद.राजपुत्र मुर्दाबाद,जनता झिंदाबाद" असं म्हणत त्यांनी राजाचा व राजपुत्राचा निर्दयपणे खून केला.

या सर्व गोंधळात पाणीखातेप्रमुख निसटला. अगदी शांतपणे तो आपल्या घरी गेला.त्याच्या बायकोने विचारलं,"अहो, गावात प्रचंड दंग चाललाय.खून मारामाऱ्या होतायत म्हणे. आपण पळून जाऊया का?"

पाणीखातेप्रमुख म्हणाला,"हे बघ,बाहेर जे चाललंय त्याने आपलं नुकसान होणार नाही. कदाचित महिनाभर पगार मिळणार नाही.पण नवी राजवट आली ना की सगळं पूर्ववत होईल. काळजी करू नकोस.कुठलाही राजा, राजवट,पार्टी, शाही माझ्या खात्याच्या केसालाही धक्का लावू शकणार नाही.मी तुला गॅरेंटी देती प्रिये."

***

# नोकरशाही -एक बांडगूळ

नोकरशाहीचा सुपरडुपरप्रमुख राजाला म्हणाला, "कर वाढवायला हवेत.पैसे कमी पडतायत."

राजा म्हणाला,"माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी कुठलाही कर वाढवणार नाही."

सुपरडुपरप्रमुख म्हणाला,"कर वाढवलाच नाही,तर नोकरशाही जी सगळी कार्ये करते, ती बंद पडतील, महाराज."

राजा म्हणाला,"ठीक आहे,होगा सो होगा. जो होगा वो देखा जायेगा."

नोकरशाहीने हळूहळू खाती बंद केली.शिक्षणखातं बंद केलं.जनता,मुलांना घरी शिकवू लागली. मोफत दवाखाने बंद केले.जनता डॉक्टरांना पैसे देऊन डॉक्टरकडे जाऊ लागली. रस्ते व साईडवॉकची झाडलोट बंद केली. जनता घरा समोरचा रस्ता स्वतः झाडू लागली. पाणीपुरवठा बंद केला. जनतेने विहिरी खणून पाणी काढायला सुरवात केली. कोर्ट बंद केली. शेजारी शेजारी एकत्र येऊन न्यायनिवाडा करू लागले .पोलिसखातं बंद केलं. शेजारी स्वतः गस्त घालू लागले.चलन नोटा बंद केल्या. लोक वस्तू व सर्व्हीसेसची अदलाबदल करू लागले. वाहतूकखातं बंद केलं. जनतेने खाजगी वाहनांची वाहतूक चालू ठेवली.

एवढ झालं तरी कर कमी झालेच नव्हते. शेवटी जनतेने एक प्रतिनिधी निवडला व तो प्रतिनिधी राजाकडे "कर का कमी होत नाहीत?हा प्रश्न विचारण्यासाठी पाठवला.

राजा म्हणाला,"आपण नोकरशाहीच्या आश्रमात जाऊ या."

राजा व प्रतिनिधी आश्रमात पोहचले तेव्हा बाहेरच्या दालनात मुलं क्रिकेट, हुतुतू, गोटया, हॉकी, बेस बॉल असे खेळ खेळत होती.

प्रतिनिधींनी विचारलं,"इथल्या ऑफिसचं काय झालं?"

मुलं म्हणाली,"आम्ही नेहमीच इथे खेळतो.इथे ऑफिसं नव्हतीच. इथे कधी कुणी नसतं."

राजा व प्रतिनिधी दालनादालनातून हिंडले.सगळीकडे धुळीचे थर साचलेल्या टेबलखुर्च्या,फाइल कॅबिनेटस,पंखे असे समान पसलेलं होतं.पण माणसं औषधालाही नव्हती. अखेरीस एका दालनात त्यांना,एका आरामखुर्चीवर शांतपणे झोपलेला एक मनुष्य सापडला. हे दालन स्वच्छ होतं. धूळ झाडलेली होती.

राजाने त्या माणसाला हलवून उठवलं आणि विचारलं,"अहो झोपाळू महाशय, तुम्ही इथे काय करताय? तुम्ही कोण आहात?"

तो मनुष्य म्हणाला,"मी पाणीखात्याचा मॅनेजर.हे माझं ऑफिस.मी खरा रजेवरच आहे.पण बाहेर फार उकडतंय आणि घरी बायकामुलं फार छळतात. म्हणून विश्रांतीसाठी कामाला येतो."

प्रतिनिधीने विचारलं,"इथले सर्व कामगार कुठे आहेत?"

"ते ना? एक पंचमांश रजेवर,एक पंचमांश सिक लीव्ह घेऊन गेले.एक पंशामांश कॅज्युअल लीव्हवर,चाळीश वर्षाखालील बायका मॅटर्निटी लीव्हवर,चाळीसवर्षावरील बायका मुलीच्या अथवा सुनेच्या बाळंतपणासाठी रजेवर,एक पंचमांश स्टाफ आहे युनियनचा लिडर,तो गेलाय युनियनच्या मिटींगला उरलासुराला स्टाफ गेलाय नुसत्याच मिटींगला."

प्रतिनिधीने झोपाळूला विचारलं,"अहो पाणीखाते मॅनेजर,पाणीपुरवठा दोन वर्षांपूर्वी बंद झाला. आता नोकरशाही जनतेसाठी पाणीपुरवठा करत नाही.मग ही नोकरशाही करते तरी काय?"

झोपाळू मनुष्य म्हणाला,"अहो,नोकरशाही कामात बिझी आहे.अहो,आमचं कर गोळा करणारं खातं अगदी जोशात चालू आहे.तुम्ही बिल्डींग नं.१५ त जाऊन पहा.तिथे कर टाळणाऱ्यांना पकडण्यासाठी पोलीस,करखात्याच्या केसेसचा न्यायनिवाडा करण्यासाठी नवीन जज्ज,त्या जज्जांसाठी कोर्टकचेऱ्या बांधण्यासाठी नवे गवंडी व सुतार असे अनेक कामगार भरती केले जात आहेत."

"पण तुम्ही नवे कामगार कामाला लावण्याऐवजी नोकरशाहीतल्याच नोकरांना बदली का करत नाही?" प्रतिनिधीने वैतागून विचारलं.

झोपाळू महाशय म्हणाला,"वा! ते कसं शक्य आहे? आमची युनियन आहे. कामगार बदली करून घ्यायला तयार नसतात. युनियन कामगाराच्या इच्छेविरुद्ध बदली करू देत नाहीत. शिवाय इथल्या सर्वच कामगारांच महत्वाच्या हुद्देदार व्यक्तींशी नातं आहे.उदा. अक्षा ही सेनापतीच्या मुलीच्या नवऱ्याची बहिण आहे. पक्ष कलेक्टरचा मेव्हणा आहे. दक्ष वाहतूक मिनिस्टरचा नातू आहे. रक्ष इन्स्पेक्टर जनरलच्या जावयाचा भाऊ आहे."

राजा म्हणाला,"पण सेनापतीला,मिनिस्टरला,कलेक्टरला,इन्स्पेक्टरला मी केव्हाच बडतर्फ करून टाकलंय."

झोपाळू म्हणाला,"वा साहेब,त्याने काय फरक पडतोय?मिनिस्टरचा,सेनापतीचा,इन्स्पेक्टरचा जॉब जाऊ शकतो पण त्यांनी चिकटवलेल्यांचा जॉब जात नाही."

प्रतिनिधी अत्यंत भडकला.तो म्हणाला,"जनतेसाठी  नोकरशाही काही करत नाही. नुसती बांडगुळासारखी वाढते मात्र आहे. नोकरशाही हा आयतं पीठ खाणारा नागोबा आहे. नोकरशाहीला आम्ही कर भरून,नोकरशाही जनतेसाठी काही करत नसताना जिवंत का म्हणून ठेवायचं ?"

झोपाळू शांतपणे म्हणाला,"लई येडे आहात तुम्ही राव. अहो,नोकरशाही जनतेसाठी नसते. जनता नोकरशाहीसाठी असते. नोकरशाही जनतेसाठी काय करते असा प्रश्न विचारायचा नसतो.जनता नोकरशाहीसाठी काय करू शकेल अशा प्रश्न विचारायचं असतो."

**समाप्त.**

पूर्व प्रसिद्धी –एकता